
217

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन,

# आदिवासी विकास विभाग

# आदिवासी आश्रम शाळांना पाणीपुरवठा योजना
# मूल्यमापन अभ्यास




**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**

**२८, क्वीन्स गार्डन,**

**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१**

दूरध्वनी क्र. ०२०-२६३६२०७१, फॅक्स क्र. ०२०-२६३६००२६

Email - trti.mah@nic.in

# आदिवासी विकास विभाग

# आदिवासी आश्रम शाळांना पाणीपुरवठा योजना मूल्यमापन अभ्यास

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन,
महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००१



वि (वाय) ५६९-१

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यात आदिवासी बांधवाना शिक्षणाची दारे खुली व्हावीत, त्यांना निवासी व दर्जेदार शिक्षण मिळावे व त्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने राज्यात शासकीय व अनुदानित आश्रमशाळा सुरू केलेल्या आहेत.

आश्रमशाळा सुरळीतपणे चालविण्यासाठी त्यांना मुलभुत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यापैकी पाणी हीसुध्दा मुलभूत गरज आहे. त्याप्रमाणे आश्रम शाळेत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच तेथे असणाऱ्या निवासी कर्मचारी वर्गासाठी, पिण्यासाठी व इतर वापरासाठी पाण्याची आवश्यकता असते. आश्रम शाळांच्या पाण्याचा प्रश्न सोडविणेसाठी आदिवासी विकास विभागामार्फत आश्रम शाळांना पाणीपुरवठा ही योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेचे मूल्यमापन, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमधील एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रम शाखेकडून करण्यात आले असून सदर मूल्यमापन निष्कर्षाचा उपयोग, योजना आखणाऱ्या व योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना होऊ शकेल, असा विश्वास वाटतो.

**(राजेश कुमार)** भाप्रसे
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे.

ठिकाण : पुणे
दिनांक : डिसेंबर २०१२

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठे | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १. | प्रकरण-१ मूल्यमापनाचा उद्देश | १ | १ |
| २. | प्रकरण-२ मूल्यमापनाची कार्यपध्दती | २ | २ |
| ३. | प्रकरण-३ पृथ:करण | ३ | २४ |
| ४. | प्रकरण-४ अडचणी व शिफारशी | २५ | २५ |
| ५. | प्रकरण-५ निष्कर्ष | २६ | २६ |

## प्रकरण क्र. १

# मूल्यमापनाचा उद्देश

शासकीय आदिवासी आश्रम शाळांना पाणीपुरवठा या योजनेचे मूल्यमापन करण्याचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१. ज्या उद्देशाने योजना सुरू केली आहे, तो उद्देश सफल झाला किंवा कसे ? हे पहाणे.

२. योजना राबविताना ज्या अडचणी आल्या, त्यांचा शोध घेणे व त्यावर उपाय सुचविणे.

प्रकरण क्र. २

# मूल्यमापनाची कार्यपध्दती

शासकीय आश्रम शाळांना पाणीपुरवठा ही योजना जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत राबविण्यात येते. या योजनेचे मुल्यमापन, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या कार्यालयातील एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रम कक्षातील पथकाकडून करण्यात आले आहे.

या मूल्यमापनासाठी नाशिक व अमरावती या दोन जिल्ह्याची निवड करण्यात आली होती. या दोन जिल्ह्यांतील एकूण १० तालुक्यांतील, ज्या आश्रमशाळांच्या, पाणीपुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे अशा २६ शासकीय आश्रमशाळांची मूल्यमापनासाठी निवड करण्यात आली.

या मूल्यमापनांतर्गत शासकीय आदिवासी आश्रमशाळांना पाणीपुरवठ्याच्या योजनांच्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा स्रोत, साठवण टाकी, योजनेची प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीची तारीख, योजना पूर्ण झाल्याची तारीख, मंजूर निधी व प्राप्त निधी, पाणी निवासी विद्यार्थ्यांना पुरेसे आहे का ? पिण्यासाठी पाणी योग्य आहे काय, पाणी शुध्दीकरणची यंत्रणा इ. बाबींची माहिती घेण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी पुरेसे पाणी उपलब्ध झाले किंवा कसे ? याची माहितीसुध्दा या दरम्यान घेण्यात आली आहे.

या आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनेविषयी सखोल माहिती जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा करून मूल्यमापन पथकातील अधिकारी, कर्मचारी यांनी घेतलेली आहे. सदर मूल्यमापन पथकामध्ये खालील अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश होता.

**मूल्यमापन पथक**

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | श्री. पी. बी. यादव | उपसंचालक |
| २. | श्री. एस. एम. यादव | सांख्यिकी अधिकारी |
| ३. | श्री. अे. टी. पाटणकर | संशोधन सहाय्यक |

• वरील मूल्यमापन पथकाकडून क्षेत्रिय काम करण्यात आले असून, मूल्यमापन अहवाल लिहीण्याचे काम श्री. के. एस. चव्हाण, उपसंचालक (एक्षेविका) यांनी केले आहे. तर संगणकीय टंकलेखनाचे काम (डी.टी.पी.) श्रीमती एस. बी. रोकडे, लघु टंकलेखक यांनी केले आहे.

प्रकरण क्र. ३

# पृथःकरण

**३.१** या कार्यालयाकडून शासकीय आश्रमशाळांना पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करण्यात आले असून त्यासाठी भेटी दिलेल्या आश्रम शाळांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | शासकीय आश्रम शाळेचे नाव |
|---|---|---|---|
| १. | नाशिक | कळवण | शासकीय आश्रमशाळा, गोपाळखडी |
| २. | नाशिक | कळवण | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, चणकापूर |
| ३. | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, माणी |
| ४. | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोल्हारे |
| ५. | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भोरमाळ |
| ६. | नाशिक | बागलाण | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, वाघंबा |
| ७. | नाशिक | मालेगाव | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, गरबड |
| ८. | नाशिक | चांदवड | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, पारेगांव |
| ९. | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, खरपडी |
| १०. | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भूवन |
| ११. | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बाडगी |
| १२. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरिपाडा |
| १३. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भीलमाळ |
| १४. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, देवगांव |
| १५. | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, सुसर्दा |
| १६. | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सावली खेडा |
| १७. | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, कुटंगा |
| १८. | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बिजुधावडी |
| १९. | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, टेंबली |
| २०. | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, टिटंबा |
| २१. | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक कन्याशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, टेंबूसोडा |
| २२. | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिखली |
| २३. | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, रायपूर |
| २४. | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, जारोदा |
| २५. | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोमा |
| २६. | अमरावती | चांदूर रेल्वे | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिरोडी |

जिल्हा, तालुका व गाववार आश्रमशाळांची संख्या खालील तक्त्यामध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. ३.२**

**तालुकावार आश्रमशाळा**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गावाची संख्या | शाळांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | **नाशिक** | कळवण | २ | . २ |
| | | सुरगणा | ३ | ३ |
| | | बागलाण | १ | १ |
| | | मालेगांव | १ | १ |
| | | चांदवड | १ | १ |
| | | पेठ | ३ | ३ |
| | | त्र्यंबकेश्वर | ३ | ३ |
| | | **एकूण** | **१४** | **१४** |
| २. | **अमरावती** | धारणी | ६ | ६ |
| | | चिखलदरा | ५ | ५ |
| | | चांदूर रेल्वे | १ | १ |
| | | **एकूण** | **१२** | **१२** |
| | | **एकूण** | **२६** | **२६** |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, नाशिक जिल्ह्यातील १४ व अमरावती जिल्ह्यातील १२ अशा एकूण २६ शासकीय आश्रमशाळांची निवड मूल्यमापनासाठी करण्यात आलेली आहे. सर्वात जास्त शाळा अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यातील ६ असून त्या खालोखाल ५ शाळा चिखलदरा तालुक्यातील आहेत.

तर सर्वात कमी म्हणजे प्रत्येकी एक शाळा नाशिक जिल्ह्यातील अनुक्रमे बागलाण, मालेगांव, चांदवड तर अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे या तालुक्यातील आहे.

निवड करण्यात आलेल्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची संख्या, जिल्हा व तालुकानिहाय खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ३.३**

**आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची संख्या**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | **नाशिक** | कळवण | ४६३ | ४६१ | ९२४ |
| | | सुरगणा | ४३९ | ११९३ | १६३२ |
| | | बागलाण | १६८ | १३७ | ३०५ |
| | | मालेगांव | १८१ | ११९ | ३०० |
| | | चांदवड | १३६ | २०१ | ३३७ |
| | | पेठ | ५५० | ४४३ | ९९३ |
| | | त्र्यंबकेश्वर | ५३५ | ७४१ | १२७६ |
| | | **एकूण** | **२४७२** | **३२९५** | **५७६७** |

**तक्ता क्र. ३.३**

**आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची संख्या--चालू.**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २. | **अमरावती** | धारणी | २२२३ | १३४६ | ३५६९ |
| | | चिखलदरा | १३८३ | १४९३ | २८७६ |
| | | चांदूर रेल्वे | २०३ | ११६ | ३१९ |
| | | **एकूण** | **३८०९** | **२९५५** | **६७६४** |
| | | **एकूण** | **६२८१** | **६२५०** | **१२५३१** |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, मूल्यमापन करण्यात आलेल्या नाशिक व अमरावती जिल्ह्यातील २६ शासकीय आश्रमशाळां मधील एकूण मुलांची संख्या ६२८१ व मुलींची संख्या ६२५० इतकी असून एकूण विद्यार्थी १२५३१ इतके आहेत. एकूण १२५३१ विद्यार्थ्यांपैकी ५७६७ (४६%) विद्यार्थी नाशिक जिल्ह्यातील तर ६७६४ (५४%) विद्यार्थी अमरावती जिल्ह्यातील आहेत.

शासकीय आश्रमशाळांना पाणीपुरवठा या योजनेच्या अंदाजित खर्च रकमेचा विचार केला असता, योजनांचा तालुकावार अंदाजित खर्च खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ३.४**

**योजनांवर झालेला खर्च**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | योजनांची संख्या | अंदाजित खर्च (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| १. | **नाशिक** | कळवण | २ | २२.५९ |
| | | सुरगणा | ३ | ३१.५८ |
| | | बागलाण | १ | १७.४९ |
| | | मालेगांव | १ | १४.९९ |
| | | चांदवड | १ | १४.९५ |
| | | पेठ | ३ | ४१.२० |
| | | त्र्यंबकेश्वर | ३ | ३८.९६ |
| | | **एकूण** | **१४** | **१८१.७६** |
| २. | **अमरावती** | धारणी | ६ | १५०.०८ |
| | | चिखलदरा | ५ | १५२.५६ |
| | | चांदूर रेल्वे | १ | १२.७१ |
| | | **एकूण** | **१२** | **३१५.३५** |
| | | **एकूण** | **२६** | **४९७.११** |

मूल्यमापनासाठी निवड करण्यात आलेल्या २६ आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांतर्गत एकूण रुपये ४९७.११ लाख खर्च झाला असून त्यापैकी रुपये ३१५.३५ लाख (६३%) खर्च, अमरावती जिल्ह्यातील १२ आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांवर झालेला आहे. तर उर्वरित रुपये १८१.७६ लाख (३७%) खर्च, नाशिक जिल्ह्यातील १४ आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांवर झालेला असल्याचे दिसून येते. यावरुन असे निदर्शनास येते की, नाशिक जिल्ह्यातील आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांवर झालेल्या खर्चापेक्षा अमरावती जिल्ह्यातील आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांवर झालेला सरासरी खर्च जास्त आहे.


जि.प. अमरावती

**तक्ता क्र. ३.५**

**आश्रमशाळा निहाय, पाणी पुरवठा योजनांच्या प्रशासकीय मंजुरीची तारीख, काम सुरू झाल्याची व काम पूर्ण झाल्याची तारीख**

| अ.क्र | जिल्हा | तालुका | शासकीय आश्रमशाळेचे नांव | योजनेच्या प्रशा. मंजुरीची तारीख | काम सुरू झाल्याची तारीख | काम पूर्ण झाल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नाशिक | कळवण | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, गोपाळखडी | २००९ | २०.३.२०१० | -- |
| २ | नाशिक | कळवण | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, चणकापूर | १३.१.२०१० | १५.३.२०१० | १६.९.२०१० |
| ३ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, माणी | २९.१२.२००९ | २८.३.२०१० | -- |
| ४ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोल्हारे | २९.१२.२००९ | २०.३.२०१० | -- |
| ५ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भोरमाळ | २९.१२.२००९ | २५.३.२०१० | -- |
| ६ | नाशिक | बागलाण | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, वाघंबा | २००९-१० | -- | -- |
| ७ | नाशिक | मालेगाव | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, गरबड | २००९-१० | -- | -- |
| ८ | नाशिक | चांदवड | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, पारेगांव | २५.२.२०१० | २०.३.२०१० | -- |
| ९ | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, खरपडी | २९.८.२००९ | २०.८.२००९ | ३०.३.२०१० |
| १० | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भूवन | २९.८.२००९ | ५.४.२०१० | डिसें.२०१० |
| ११ | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बाडगी | २९.८.२००९ | ५.४.२०१० | -- |
| १२ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरिपाडा | २.३.२०१० | एप्रिल २०१० | ४.९.२०१० |
| १३ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भीलमाळ | ५.१.२०१० | १०.३.२०१० | -- |
| १४ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, देवगांव | ५.१.२०१० | १०.३.२०१० | -- |
| १५ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, सुसर्दा | २०.१२.२००७ | ११.३.२००८ | १०.७.२००८ |
| १६ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सावली खेडा | ५.१२.२००७ | २९.११.२००८ | ५.३.२००९ |
| १७ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, कुटंगा | २०.१२.२००७ | ११.३.२००८ | १०.७.२००८ |
| १८ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बिजुधावडी | ५.१२.२००७ | २९.११.२००८ | २००९ |

**तक्ता क्र. ३.५**

**आश्रमशाळा निहाय, पाणीपुरवठा योजनांच्या प्रशासकीय मंजुरीची तारीख, काम सुरू झाल्याची व काम पूर्ण झाल्याची तारीख--चालू.**

| अ.क्र<br>१ | जिल्हा<br>२ | तालुका<br>३ | शासकीय आश्रम शाळेचे नांव<br>४ | योजनेच्या प्रशा. मंजुरीची तारीख<br>५ | काम सुरु झाल्याची तारीख<br>६ | काम पूर्ण झाल्याची तारीख<br>७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १९ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, टेंबली | ५.१२.२००७ | २००८ | -- |
| २० | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, टिटंबा | २०.१२.२००७ | ११.३.२००८ | १०.७.२००८ |
| २१ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक कन्याशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, टेंबूसोडा | १.१२.२००७ | १०.२.२००८ | -- |
| २२ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिखली | २०.१२.२००७ | १४.३.२००८ | -- |
| २३ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, रायपूर | १५.२.२००८ | १.१२.२००८ | ३१.३.२००९ |
| २४ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, जारीदा | १०.१२.२००७ | १०.३.२००८ | -- |
| २५ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोमा | १.१२.२००७ | ५.१.२००८ | ३०.३.२००८ |
| २६ | अमरावती | चांदूर रेल्वे | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिरोडी | १.१२.२००७ | ९.२.२००८ | -- |

नाशिक जिल्ह्यांतील १४ आश्रमशाळा पाणी पुरवठा योजनांपैकी ४ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण झालेली असून, आश्रमशाळांना पाणीपुरवठा चालू आहे. तर ८ ठिकाणी योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित २ पैकी एका ठिकाणी, योजनेचे काम शेतात पिके असल्यामुळे प्रलंबित आहे. शेतातील पिके निघताच काम चालू करण्यात येणार आहे. तर एका ठिकाणी काम नुकतेच चालू झालेले आहे.

अमरावती जिल्ह्यांतील एकूण १२ आश्रमशाळांनी पाणीपुरवठा योजनांपैकी ७ ठिकाणी कामे पूर्ण झालेली असून शाळांना पाणीपुरवठा चालू आहे. तर उर्वरित ५ ठिकाणी कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच दोन्ही जिल्ह्यातील कामे अपूर्ण असलेल्या ठिकाणी काही किरकोळ अडचणी आल्या होत्या त्या दूर करून पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**तक्ता क्र. ३.६**

**आश्रमशाळा पाणीपुरवठा, योजनानिहाय झालेला खर्च व कामाची स्थिती**

| अ.क्र | जिल्हा | तालुका | शासकीय आश्रम शाळेचे नाव | प्राप्त निधी (रुपये लाखात) | झालेला खर्च (रुपये लाखात) | कामाची स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नाशिक | कळवण | शासकीय आश्रमशाळा, गोपाळखडी | १०.३८ | -- | प्रगतीत |
| २ | नाशिक . | कळवण | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, चणकापूर | १२.२१ | ११.९० | पूर्ण |
| ३ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, माणी | ८.०५ | ४.४८ | प्रगतीत |
| ४ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोव्हारे | १३.२८ | ५.४८ | प्रगतीत |
| ५ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भोरमाळ | १०.२५ | -- | प्रगतीत |
| ६ | नाशिक | बागलाण | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, वाघंबा | १७.४९ | -- | प्रगतीत |
| ७ | नाशिक | मालेगाव | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, गरबड | १४.९९ | ९.७६ | प्रगतीत |
| ८ | नाशिक | चांदवड | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, पारेगांव | १४.९५ | ३.७३ | प्रगतीत |
| ९ | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, खरपडी | १३.२६ | १३.३२ | पूर्ण |
| १० | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भूवन | १३.२१ | ९.५० | पूर्ण |
| ११ | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बाडगी | १४.७३ | १२.८ | प्रगतीत |
| १२ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरिपाडा | १३.०९ | -- | पूर्ण |
| १३ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भीलमाळ | १४.४१ | ६.६४ | प्रगतीत |
| १४ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, देवगांव | ११.४६ | ५.०४ | प्रगतीत |
| १५ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय सुसर्दा | २४.४६ | २०.९५ | पूर्ण |
| १६ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सावली खेडा | २९.०२ | ३०.०६ | पूर्ण |
| १७ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, कुटंगा | २०.८२ | २९.२० | पूर्ण |
| १८ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बिजुधावडी | २७.२६ | २७.५१ | पूर्ण |

**तक्ता क्र. ३.६**

**आश्रमशाळा पाणीपुरवठा, योजनानिहाय झालेला खर्च व कामाची स्थिती--चालू**

| अ.क्र १ | जिल्हा २ | तालुका ३ | शासकीय आश्रम शाळेचे नाव ४ | प्राप्त निधी (रुपये लाखात) ५ | झालेला खर्च (रुपये लाखात) ६ | कामाची स्थिती ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १९ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, टेंबली | २६.५७ | २७.१४ | प्रगतीत |
| २० | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, टिटंबा | २१.९५ | २०.६६ | पूर्ण |
| २१ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, टेंबूसोडा. | १४.७२ | १४.७२ | प्रगतीत |
| २२ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिखली | १४.६४ | १४.६४ | प्रगतीत |
| २३ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रम,शाळा रायपूर | २९.३८ | २६.५५ | पूर्ण |
| २४ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, जारोदा. | १५.९४ | १४.२७ | प्रगतीत |
| २५ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोमा | १४.०८ | १३.३ | पूर्ण |
| २६ | अमरावती | चांदूर रेल्वे | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिरोडी | १२.७१ | २.३७ | प्रगतीत |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, एकूण २६ आश्रमशाळांमधील पाणीपुरवठा योजनांपैकी ११ ठिकाणी (४२ टक्के) योजना पुर्ण झालेल्या असून, पाणी योजनेचा लाभ संबधित आश्रम शाळेतील मुलांना होत आहे. तर १५ ठिकाणी (५८ टक्के) योजनांचे काम प्रगतीपथावर असल्यामुळे सदर शाळेतील मुले सध्या या योजनेच्या पाण्यापासून वंचित आहेत.

**तक्ता क्र. ३.७**

**आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनेच्या पाण्याचा उद्भव**

एकूण २६ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांचा योजनानिहाय पाण्याचा मूळ उद्भव, उद्भवाचे ठिकाण, उद्भवाची क्षमता व काम पूर्ण झाले आहे किंवा अपूर्ण आहे, या चार बाबींचा अभ्यास केला असता खालीलप्रमाणे परिस्थिती दिसून येते.


| अ.क्र<br>१ | जिल्हा<br>२ | तालुका<br>३ | शासकीय आश्रम शाळेचे नाव<br>४ | पाण्याचा मूळ उद्भव<br>५ | उद्भवाचे ठिकाण<br>६ | क्षमता (महिने)<br>७ | कामांची सद्य:स्थिती पूर्ण / अपूर्ण<br>८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | कळवण | शासकिय आश्रमशाळा, गोपाळखडी | विंधन विहीर | -- | शून्य | पूर्ण |
| २ | नाशिक | कळवण | शासकीय माध्यमिक उच्च माध्यमिक आश्रमशाळा, चणकापूर | जुनी विहीर | -- | बारमाही | पूर्ण |
| ३ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, माणी | विंधन विहीर | आवारात | बारमाही | पूर्ण |
| ४ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोल्हारे | विहीर | -- | बारमाही | अपूर्ण |
| ५ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भोरमाळ | विंधन विहीर | स्मशानभूमीजवळ | बारमाही | अपूर्ण |
| ६ | नाशिक | बागलाण | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, वाघंबा | विहीर | -- | -- | अपूर्ण |
| ७ | नाशिक | मालेगाव | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, गरबड | धरण | धरण | बारमाही | अपूर्ण |
| ८ | नाशिक | चांदवड | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, पारेगांव | विहीर | -- | बारमाही | पूर्ण |
| ९ | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, खरपडी | विहीर | लगतचा ओढा | बारमाही | पूर्ण |
| १० | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भूवन | विहीर | -- | बारमाही | पूर्ण |
| ११ | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बाडगी | विहीर | -- | बारमाही | पूर्ण |
| १२ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरिपाडा | विहीर | -- | बारमाही | पूर्ण |
| १३ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भीलमाळ | विहीर | -- | बारमाही | पूर्ण |
| १४ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, देवगांव | विहीर | -- | बारमाही | पूर्ण |
| १५ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, सुसर्दा. | विंधन विहीर | आवारात | बारमाही | पूर्ण |

**तक्ता क्र. ३.७**

**आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनेच्या पाण्याचा उद्भव--चालू.**

| अ.क्र १ | जिल्हा २ | तालुका ३ | शासकीय आश्रम शाळेचे नाव ४ | पाण्याचा मूळ उद्भव ५ | उद्भवाचे ठिकाण ६ | क्षमता (महिने) ७ | कामांची सद्यस्थिती पूर्ण / अपूर्ण ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सावलीखेडा | विहीर | २३०० मीटर | बारमाही | पूर्ण |
| १७ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, कुटंगा | जुनी विहीर | ८४५ मीटर | बारमाही | पूर्ण |
| १८ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बिजुधावडी | विहीर | १४१० मीटर | बारमाही | पूर्ण |
| १९ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, टेंबली | विंधन विहीर | आवारात | बारमाही नाही | पूर्ण |
| २० | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, टिटंबा | विंधन विहीर | आवारात | बारमाही | पूर्ण |
| २१ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, टेंबूसोडा. | विंधन विहीर | आवारात | बारमाही नाही | पूर्ण |
| २२ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिखली | विहीर | जवळच | बारमाही नाही | पूर्ण |
| २३ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, रायपूर | विहीर | शाळेलगत | बारमाही | पूर्ण |
| २४ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, जारीदा. | विहीर | ५२८ मीटर | बारमाही नाही | पूर्ण |
| २५ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोमा | विंधन विहीर | ४१० मीटर | बारमाही | पूर्ण |
| २६ | अमरावती | चांदूर रेल्वे | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिरोडी | विहीर | ११७० मीटर | बारमाही | पूर्ण |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की एकूण २६ आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांपैकी ८ आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांचे पाण्याचे उद्भव, विंधन विहीरी असून १७ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांच्या पाण्याचे उद्भव, साधी विहीर आहे तर उर्वरित एका ठिकाणच्या पाण्याचा उद्भव, धरण आहे. वरील २६ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांपैकी, २० आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांचा पाणी पुरवठा, बारमाही स्वरुपाचा असून, ४ ठिकाणचा पाणीपुरवठा बारमाही होत नसल्याचे संबधिताकडून सांगण्यात आले आहे. एका पाण्याच्या उद्भवाच्या विधंन विहीरीला पाणीच लागले नाही तर एका विहीरीचे खोदकाम एजन्सीने वेळेवर सुरू न केल्याने संबंधीत आश्रम शाळेला पाणीपुरवठा होत नसल्याचे दिसून आले आहे.



## तक्ता क्र. ३.८

## आश्रमशाळानिहाय पाणीपुरवठा योजनांच्या विद्युत पुरवठ्याची स्थिती

| अ.क्र. १ | जिल्हा २ | तालुका ३ | शासकीय आश्रम शाळेचे नाव ४ | विज कनेक्शन मिळाले का ? ५ | पाणीपुरवठा पंपाची क्षमता ६ |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | कळवण | शासकीय आश्रमशाळा, गोपाळखडी | नाही (सुधारित प्रस्ताव मंजुरीसाठी सादर) | -- |
| २ | नाशिक | कळवण | शासकीय माध्यमिक उच्च माध्यमिक आश्रमशाळा, चणकापूर | होय | ३ एच. पी., २ पंप |
| ३ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, माणी | नाही | -- |
| ४ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोल्हारे | नाही | -- |
| ५ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भोरमाळ | नाही | -- |
| ६ | नाशिक | बागलाण | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, वाघंबा | नाही | -- |
| ७ | नाशिक | मालेगाव | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, गरबड | होय | ३ एच. पी., २ पंप |
| ८ | नाशिक | चांदवड | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, पारेगाव | विहीरीचे काम पूर्ण | -- |
| ९ | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, खरपडी | होय | -- |
| १० | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भूवन | होय | -- |
| ११ | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बाडगी | टाकीचे काम व पंप हाऊस काम बाकी | |
| १२ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरिपाडा | होय | -- |
| १३ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भीलमाळ | नाही | -- |
| १४ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, देवगांव | नाही | -- |
| १५ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, सुसर्दा | होय | ५ एच. पी. |
| १६ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सावलीखेडा | होय | ५ एच. पी |

## तक्ता क्र. ३.८

## आश्रमशाळानिहाय पाणीपुरवठा योजनांच्या विद्युत पुरवठ्याची स्थिती--चालू.

| अ.क्र. १ | जिल्हा २ | तालुका ३ | शासकीय आश्रम शाळेचे नाव ४ | विज कनेक्शन मिळाले का ? ५ | पाणीपुरवठा पंपाची क्षमता ६ |
|---|---|---|---|---|---|
| १७ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, कुटंगा | होय | ५ एच. पी. |
| १८ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बिजुधावडी | होय | ५ एच.पी. |
| १९ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, टेंबली | होय | ५ एच.पी. |
| २० | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, टिटंबा | होय | ५ एच.पी. |
| २१ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक कन्याशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, टेंबूसोडा | होय | ५ एच.पी. |
| २२ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिखली | होय | ५ एच.पी. |
| २३ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, रायपूर | सौरपंप | २.२ एच.पी. |
| २४ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, जारीदा | होय | ४ एच.पी. |
| २५ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोमा | होय | ४ एच.पी. |
| २६ | अमरावती | चांदूर रेल्वे | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिरोडी | शेतकऱ्यांने पाईपलाईनचे काम अडविल्यामुळे उशिर झाला त्यामुळे सुधारित प्रस्ताव नव्या दराने मंजुरीसाठी सादर केला आहे. | |

एकूण २६ आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांपैकी, १५ आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजना पूर्ण होऊन, वीज पंपाना, विज कनेक्शन मिळालेले आहे. तर एका ठिकाणच्या आश्रमशाळेचा पंप सौर उर्जेवर चालू आहे. ६ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांची कामे वेगवेगळया कारणांमुळे अपुरी आहेत. त्यामुळे त्या शाळांना पिण्याचा पाणीपुरवठा होत नाही असे निदर्शनास आलेले आहे. तर दोन आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांची कामे वेळेत होऊ न शकल्याने त्या आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांचे सुधारित प्रस्ताव नवीन दराने फेर मंजुरीसाठी पाठविलेले आहेत. तर दोन आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांची, उद्भवाच्या विहीरीची कामे पूर्ण झालेली आहेत, तथापि पंप हाऊस व पाण्याच्या टाकीची कामे अपूर्ण आहेत. त्यामुळे त्या आश्रमशाळा पाण्यापासून वंचित आहेत.

तक्ता क्र. ३.९


**आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांची प्रशासकीय मंजुरीची तारीख व कामास सुरूवात झाल्याची तारीख**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | शासकीय आश्रम शाळेचे नाव | योजनेच्या प्रशासकीय मंजुरीची तारीख | योजनेचे काम सुरू झाल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नाशिक | कळवण | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, गोपाळखडी | २००९-१० | २०.३.२०१० |
| २ | नाशिक | कळवण | शासकीय माध्यमिक उच्च माध्यमिक आश्रमशाळा, चणकापूर | १३.१.२०१० | १५.३.२०१० |
| ३ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, माणी | २९.१२.२००९ | २८.३.२०१० |
| ४ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोल्हारे | २९.१२.२००९ | २०.३.२०१० |
| ५ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भोरमाळ | २९.१२.२००९ | २५.३.२०१० |
| ६ | नाशिक | बागलाण | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, वाधंबा | २००९-१० | काम सुरू नाही |
| ७ | नाशिक | मालेगाव | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, गरबड | २००९-१० | काम सुरू नाही |
| ८ | नाशिक | चांदवड | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, पारेगांव | २५.२.२०१० | २०.३.२०१० |
| ९ | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, खरपडी | २०.८.२००९ | ३०.३.२०१० |
| १० | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भूवन | २९.८.२००९ | ५.१२.२००९ |
| ११ | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बाडगी | २९.८.२००९ | ५.४.२०१० |
| १२ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरिपाडा | २.३.२०१० | एप्रिल २०१० |
| १३ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भीलमाळ | ५.१.२०१० | १०.३.२०१० |
| १४ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, देवगाव | ५.१.२०१० | १०.३.२०१० |
| १५ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, सुसर्दा | २०.१२.२००७ | ११.३.२००८ |
| १६ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सावलीखेडा | ५.१२.२००७ | २९.११.२००८ |
| १७ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा,कुटंगा | २०.१२.२००७ | ११.३.[illegible]००८ |
| १८ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बिजुधावडी | ५.१२.२००७ | २९.१[illegible] २००८ |

**तक्ता क्र. ३.९**

**आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांची प्रशासकीय मंजुरीची तारीख व कामास सुरूवात झाल्याची तारीख--चालू.**

| अ.क्र.<br>१ | जिल्हा<br>२ | तालुका<br>३ | शासकीय आश्रम शाळेचे नाव<br>४ | योजनेच्या प्रशासकीय मंजुरीची तारीख<br>५ | योजनेचे काम सुरू झाल्याची तारीख<br>६ |
|---|---|---|---|---|---|
| १९ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, टेंबली | ५.१२.२००७ | २००८ |
| २० | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, टिटंबा | २०.१२.२००७ | ११.३.२००८ |
| २१ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक कन्याशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, टेंबूसोडा | १.१२.२००७ | १०.२.२००८ |
| २२ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आंश्रमशाळा, चिखली | २०.१२.२००७ | १४.३.२००८ |
| २३ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, रायपूर | १५.२.२००८ | १.१२.२००८ |
| २४ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, जारीदा | १०.१२.२००७ | १०.३.२००८ |
| २५ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोमा | १.१२.२००७ | ५.१.२००८ |
| २६ | अमरावती | चांदूर रेल्वे | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिरोडी | १.१२.२००७ | ९.२.२००८ |


शासकीय आदिवासी आश्रम शाळा
नळ पाणी पुरवठा योजना
बिजूधावडी
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग अमरावती ◆ उपविभाग धारणी

## तक्ता क्र. ३.१०

## आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांच्या मुख्य टाकीचे बांधकाम व वितरण व्यवस्थेची सद्य:स्थिती

| अ.क्र | जिल्हा | तालुका | शासकीय आश्रम शाळेचे नाव | आश्रम शाळेच्या मुख्य टाकीचे बांधकाम पूर्ण/अपूर्ण | टाकीची क्षमता (लिटर) | वितरण व्यवस्था सद्य:स्थिती पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नाशिक | कळवण | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, गोपाळखडी | काम सुरू नाही | -- | -- |
| २ | नाशिक | कळवण | शासकीय माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा, चणकापूर | पूर्ण | २५००० | पूर्ण |
| ३ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, माणी | पूर्ण | ३०००० | पूर्ण |
| ४ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोल्हारे | पूर्ण | २०००० | अपूर्ण |
| ५ | नाशिक | सुरगणा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भोरमाळ | पूर्ण | २०००० | पूर्ण |
| ६ | नाशिक | बागलाण | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, वाघंबा | अपूर्ण | -- | -- |
| ७ | नाशिक | मालेगाव | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, गरबड | पूर्ण | २०००० | पूर्ण |
| ८ | नाशिक | चांदवड | शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, पारेगाव | अपूर्ण | -- | -- |
| ९ | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, खरपडी | पूर्ण | १५००० | पूर्ण |
| १० | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भूवन | पूर्ण | १५००० | पूर्ण |
| ११ | नाशिक | पेठ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, बाडगी | सुरू नाही | २०००० | -- |
| १२ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरिपाडा | पूर्ण | २०००० | पूर्ण |
| १३ | नाशिक | त्र्यंबके श्वर | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भीलमाळ | अपूर्ण | -- | अपूर्ण |
| १४ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, देवगाव | जुनी दुरुस्ती पूर्ण | -- | -- |
| १५ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, सुसर्दा | पूर्ण | ३०००० | पूर्ण |
| १६ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सावलीखेडा | पूर्ण | ३०००० | पूर्ण |
| १७ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, कुटंगा | पूर्ण | ३०००० | पूर्ण |

तक्ता क्र. ३.१०

आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांच्या मुख्य टाकीचे बांधकाम व वितरण व्यवस्थेची सद्य:स्थिती--चालू.

| अ.क्र | जिल्हा | तालुका | शासकीय आश्रम शाळेचे नाव | आश्रम शाळेच्या मुख्य टाकीचे बांधकाम पूर्ण/अपूर्ण | टाकीची क्षमता (लिटर) | वितरण व्यवस्था सद्य:स्थिती पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १८ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, बिजुधावडी | पूर्ण | ३०००० | पूर्ण |
| १९ | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, टेंबली | पूर्ण | ५०००० | पूर्ण |
| २० | अमरावती | धारणी | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, टिटंबा | पूर्ण | ३०००० | पूर्ण |
| २१ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, टेंबूसोडा | अपूर्ण | -- | अपूर्ण |
| २२ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिखली | पूर्ण | ३०००० | पूर्ण |
| २३ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, रायपूर | पूर्ण | -- | पूर्ण |
| २४ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, जारीदा | पूर्ण | ३०००० | पूर्ण |
| २५ | अमरावती | चिखलदरा | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, डोमा | पूर्ण | ३०००० | पूर्ण |
| २६ | अमरावती | चांदूर रेल्वे | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिरोडी | काम सुरू नाही | -- | -- |

वरील २६ आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांपैकी, १९ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांच्या मुख्य टाक्यांची बांधकामे पूर्ण झाली असून, उर्वरित ७ आश्रमशाळांच्या योजनांपैकी पाच आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांच्या, मुख्य टाकीची बांधकामे अपूर्ण अवस्थेत आहेत. तर २ ठिकाणी मुख्य टाक्यांची बांधकामे अद्याप सुरू झालेली नाहीत, कारण ठेकेदाराने जुन्या किंमतीमध्ये कामे करण्यास नकार दिला असून नवीन सुधारित प्रस्ताव मंजुरीसाठी प्रकल्प कार्यालयाकडे पाठविलेले आहेत.

प्रकरण क्र. ४

# अडचणी व शिफारशी

१. ठेकेदार, जुन्या दराने पाण्याच्या उद्भवाच्या विहिरींची कामे करण्यास तयार नसल्याने सुधारित प्रस्ताव प्रकल्प कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर केलेले आहेत.

उद्भवाच्या विहिरींची कामे वेळच्या वेळी झाली नाहीत. ती कामे जर वेळेत सुरू करून पूर्ण केली असती तर सुधारीत दराने प्रस्ताव मंजुरीसाठी प्रकल्प कार्यालयाकडे पाठविण्याची गरज भासली नसती. तसेच पाणीपुरवठा योजनेचा खर्च वाढला नसता व आश्रमशाळांना पाण्यापासून वंछित रहावे लागले नसते.

२. एका ठिकाणी, शेतात पिके असल्याने योजनेच्या पाईप लाईनचे काम सुरू करता आलेले नाही. शेतातील पिके निघताच, त्वरीत योजनेचे काम हाती घेऊन पूर्ण करण्यात यावे.

३. एका ठिकाणी कमी क्षमतेच्या विज पुरवठयामुळे पाणीपुरवठा योजना बंद आहे. अशा ठिकाणी योग्य त्या क्षमतेचा वीजपुरवठा करून त्वरित शाळेस पाणीपुरवठा कसा होईल याची दक्षता घेणे जरूरी आहे. योजना कार्यान्वीत होताना शाळेचे मुख्याध्यापक व संबंधीत विज वितरण अधिकारी यांनी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

४. काही ठिकाणी उद्भवाच्या विंधन विहिरीस पाणी कमी लागल्याने तर काही ठिकाणी विहिरीस पाणी कमी लागल्याने नविन विहिरींचा प्रस्ताव मंजुरीसाठी प्रकल्प कार्यालयाकडे पाठविलेला आहे.

याबाबतीत सत्वर कार्यवाही करून शाळेस पाणीपुरवठा त्वरित कसा होईल याची दक्षता घेण्यात यावी.

५. शेतकऱ्याने पाईप लाईनचे काम अडविल्यामुळे पाणी पुरवठयास उशीर झाला व त्यामुळे ठेकेदार जुन्या दराने काम करण्यास तयार नाही.

शेतकऱ्याने पाईप लाईनचे काम अडविले आहे. हा प्रश्न सामोपचाराने मिटवून किंवा तहसिलदार यांचेकडे तक्रार करून त्वरित पाईपलाईनचे काम करुन घेणे अपेक्षित होते व शाळेस पाणीपुरवठा करणे आवश्यक होते.

६. काही ठिकाणी पाण्याच्या मुख्य टाकीची तर काही ठिकाणी पाईप लाईनची कामे अपूर्ण आहेत.

आश्रमशाळांना पाणीपुरवठा ही योजना आश्रम शाळेत राहणारे विद्यार्थी व तेथे राहणारे कर्मचारी यांचे जीवनाशी निगडीत मुलभूत गरज असल्याने या योजना तत्परतेने पूर्ण करून तेथे राहणारे विद्यार्थी व कर्मचारी यांची त्वरित पिण्याच्या पाण्याची सोय करणे गरजेचे आहे.

७. वरील बाबीवरून कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे होते किंवा नाही याची प्रत्यक्ष तपासणी केली जात नाही असे निदर्शनास येते.

कार्यक्रमाची / कामाची तपासणी करणेसाठी स्वतंत्र यंत्रणा असावी. जेणेकरून सदरची यंत्रणा क्षेत्रिय पातळीवर कामांना प्रत्यक्ष भेटी देवून त्यावर उपाय योजना सुचवून त्वरित कामे मार्गी लागतील हे पाहीले पाहीजे.

## प्रकरण क्र. ५

# निष्कर्ष

१. एकूण २६ शासकीय आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांचे मूल्यमापन करण्यात आले आहे. त्यापैकी १४ (५४%) आश्रमशाळा पाणी पुरवठा योजना नाशिक जिल्ह्यातील तर उर्वरित १२ (४६%) आश्रमशाळा पाणीपुरवठा योजना या अमरावती जिल्ह्यातील आहेत.

२. एकूण २६ शासकीय आश्रमशाळांतील १२५३१ निवासी विद्यार्थ्यांपैकी ५७६७ (४६%) विद्यार्थी नाशिक जिल्ह्यातील तर ६७६४ (५४%) विद्यार्थी हे अमरावती जिल्ह्यातील आहेत. एकूण ६२८१ मुलांपैकी २४७२ (३९%) मुले नाशिक तर ३८०९ (६१%) मुले अमरावती जिल्ह्यातील आहेत आणि ६२५० मुलीं पैकी ३२९५ (५३%) मुली नाशिक जिल्ह्यातील तर २९५५ (४७%) मुली अमरावती जिल्ह्यातील आहेत.

३. २६ आश्रमशाळा पाणी पुरवठ्याच्या योजनांवर एकूण रु. ४९७.११ लाख खर्च झालेला आहे. त्यापैकी रु. १८१.७६ लाख (३७%) खर्च नाशिक जिल्ह्यातील १४ आश्रमशाळांच्या पाणीपुरवठा योजनांवर झालेला आहे, तर रु. ३१५.३५ लाख (६३%) खर्च अमरावती जिल्ह्यातील १२ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांवर झालेला आहे.

४. नाशिक जिल्ह्यातील १४ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांपैकी ९ (६४%) आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण झाली असून ५ (३६%) आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांची कामे निरनिराळ्या कारणामुळे अपुरी आहेत. तसेच अमरावली जिल्ह्यातील १२ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांपैकी ७ (५८%) आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण झालेली असून ५ (४२%) ठिकाणांची कामे अद्याप अपूर्ण आहेत. अपूर्ण कामामध्ये प्रामुख्याने काही योजनांचे पंप हाऊस तर काही योजनांचे पाईप लाईनचे व नळ कोंढाळी बसविण्याचे काम बाकी असल्याचे निदर्शनास आले आहे.

५. एकूण २६ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांच्या, पाण्याच्या २२ उद्‌भवाचे (८५%) काम पूर्ण झालेले असून ४ ठिकाणच्या उद्‌भवाचे (१५%) काम अपूर्ण अवस्थेत आहे.

६. एकूण २६ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांपैकी ८ (३१%) ठिकाणी, पाणीपुरवठा विंधन विहिरीवरून तर १७ ठिकाणी (६५%) पाणीपुरवठा, साध्या विहिरीवरुन तर १ ठिकाणी (४%) पाणीपुरवठा धरणातून होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच या २६ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांपैकी, २० ठिकाणी (७७%) पाणीपुरवठा बारमाही असून, ४ ठिकाणी (१५%) पाणीपुरवठा हंगामी असल्याचे दिसून आले आहे. उर्वरित दोन ठिकाणांपैकी एका ठिकाणी विंधन विहिरीस पाणी लागले नाही, तर दुसऱ्या ठिकाणी विहिरीचे काम एजन्सीने वेळेवर सुरू केले नसल्याचे दिसून आले आहे.

७. २६ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनांपैकी, १५ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजना पूर्ण होऊन, विजपंपाना विज कनेक्शन मिळालेले आहे. तर एक पंप सौर उर्जेवर चालू आहे. उर्वरित ८ ठिकाणी कामे वेगवेगळया कारणांमुळे अपुरी आहेत.

८. आश्रमशाळा पाणीपुरवठा योजना मंजुरीची तारीख व प्रत्यक्ष कामास सुरूवात झाल्याची तारीख याचा विचार केला असता असे निदर्शनास येते की, योजना मंजूर झाल्याच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत फक्त १ आश्रमशाळा पाणीपुरवठा योजनेच्या कामास सुरूवात झालेली आहे. तर ३ महिन्याच्या आत १४ ठिकाणी कामास सुरूवात झाली आहे. तर एका ठिकाणी कामास सुरूवात करण्यास ३ ते ६ महिन्याचा कालावधी लागला व ६ महिन्यानंतर ५ ठिकाणी कामास सुरूवात झाली.

९. शासकीय आश्रमशाळांना पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासाठी राबविण्यात आलेल्या या २६ योजनांपैकी १९ ठिकाणी पाण्याच्या मुख्य टाक्यांची बांधकामे पूर्ण करण्यात आलेली असून उर्वरित ७ ठिकाणांपैकी ५ ठिकाणी मुख्य पाण्याच्या टाकीची बांधकामे अपूर्ण अवस्थेत आहेत. २ ठिकाणी मुख्य टाकीचे बांधकामे अद्याप सुरू झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

***



येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-६